# इंडस हेल्थ प्लस सबर्बन डायग्नोस्टिक्ससोबत सहयोगाने कोविड-१९ची नैदानिक चाचणी करणार

April 8, 2020 21 0




**:** इंडस हेल्थ प्लस या प्रतिबंधात्मक हेल्थकेअरमधील अग्रणी कंपनीने आज कोविड-१९ नैदानिक चाचण्या करण्यासाठी सबर्बन डायग्नोस्टिक्स (इंडिया) प्रा. लि.सोबत सहयोगाची घोषणा केली. हा सहयोग कोविड-१९च्या व्यापक चाचणीच्या माध्यमातून संसर्गाच्या संक्रमणावर प्रतिबंध व नियंत्रण ठेवण्यावर भर देण्याचा मनसुबा ठेवतो. आयसीएमआरने कोविड-१९साठी चाचण्या करण्याकरिता सबर्बन डायग्नोस्टिक्सला खाजगी प्रयोगशाळांपैकी एक म्हणून मान्यता दिली आहे.

भारतातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रामध्ये या आजाराचे सर्वाधिक रुग्ण आहेत आणि मुंबई व पुणे ही शहरे या यादीमध्ये उच्च स्थानावर आहेत. म्हणून कंपनीच्या उपक्रमाचा भाग म्हणून मुंबई व पुण्यामध्ये प्रथम चाचणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पुढील टप्प्यामध्ये इंडस हेल्थ प्लस देशातील इतर राज्ये व शहरांमध्ये ही सुविधा देणार आहे. अपॉइण्टमेंट्स व पेमेण्ट्स इंडस हेल्थ प्लसच्या वेबसाइटवर किंवा संपर्क साधून करता येऊ शकते. सबर्बन डायग्नोस्टिक्स घरी येऊन किंवा सेंटरमध्ये नमुने गोळा करतील. तसेच सरकारने दिलेल्या सूचनांनुसार डॉक्टरांकडून वैध प्रीस्क्रिप्शन आणि फोटो ओळखपत्रासह पत्ता पुरावा आवश्यक आहे आणि चाचणीच्या वेळी ही सर्व कागदपत्रे सादर करावी.

**इंडस हेल्थ प्लसचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक श्री. अमोल नाईकवडी** या विकासाबाबत बोलताना म्हणाले, "आम्हाला आजाराचे लवकर निदान व प्रतिबंधाचे महत्त्व माहित आहे. म्हणूनच व्यापक चाचणी धोरण हा कोविड-१९च्या संसर्गावर नियंत्रण ठेवण्याचा उत्तम मार्ग आहे. सद्यस्थितीमध्ये या आजाराची कोणत्याही प्रकारची लक्षणे दिसून येणा-या लोकांपर्यंत पोहोचत त्यांना योग्य मार्गदर्शन व योग्य माहिती देणे आवश्यक आहे. आमची कंपनी प्रतिबंधाप्रती कटिबद्ध आहे आणि म्हणूनच आम्ही मुंबई व पुण्यामध्ये या चाचण्या उपलब्ध करून देण्यासाठी सबर्बन डायग्नोस्टिक्ससोबत सहयोग जोडला आहे. आम्ही पाठिंबा देण्यासह मदतीचा हात पुढे करण्यामध्ये कायम पुढाकार घेत राहू. ज्यामुळे इंडस हेल्थ प्लस आपल्या देशातील या घातक स्थितीवर नियंत्रण मिळवण्याच्या लढ्याचा भाग बनू शकेल."

खाजगी प्रयोगशाळा सरकारच्या सूचनांनुसार रिअल-टाइम पॉलिमेरेस चेन रिॲक्शन (पीसीआर) आधारित चाचणी करू शकतात. तसेच फक्त प्रमाणित फ्लेबोटॉमिस्ट थेट रूग्णाच्या घरामधून चाचणी नुमने गोळा करतील. कर्मचारी चाचणीसाठी घसा व नाकातील स्वॅब्स घेताना आयसीएमआर मार्गदर्शकतत्त्वांनुसार आवश्यक खबरदारीचे उपाय घेतील. गोळा करण्यात आलेले नमुने कोविड-१९ नैदानिक चाचणीसाठी सबर्बन डायग्नोस्टिक्स प्रयोगशाळेमध्ये पाठवण्यात येतील. नमुना गोळा केल्यानंतर २४ ते ४८ तासांमध्ये रूग्णांना रिपोर्ट देण्यात येईल.

शोध

Search

– Advertisement –

अलीकडील पोस्ट

कोविड-19 संक्रमण के बीच कुंडली भाग्य के संजय गगनानी ने 23 टीवी सेलिब्रिटीज़ के साथ मिलकर की स्पेशल अपील – घर बैठो इंडिया
April 15, 2020

टेक्नो ने कोविड-19 के दौरान भारत के कम आमदनी वाले वर्गों की सहायता करने के लिए चैनल पार्टनर्स और ज़ोमैटो से सहयोग किया
April 15, 2020

धक्कादायक: सहा महिन्यांच्या बाळाला करोना
April 14, 2020

चिंता वाढली!आणखी चार रुग्णांचा मृत्यू; मृतांचा एकूण आकडा 38 वर
April 14, 2020

दुधाच्या टँकरमधून बिअरच्या बाटल्यांची वाहतूक
April 14, 2020

Contact Us

लोकप्रिय श्रेणी

मराठी 95
English 71
ताज़ा खबरे 57
पुणे 43
महाराष्ट्र 40
बिज़नेस 20